एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत रेशीम शेती व त्यावर आधारीत पुरक उद्योगाचा विकास करण्यासाठी तुती व टसर कोष/सुत खरेदी विक्रीसाठी खुली शासकीय बाजारपेठ व कच्च्या रेशीम एक्सचेंज मार्केट स्थापन करण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**

**शासन निर्णय क्र. सपववि-४००१२/१५/२०२४-DESKSERICULTURE-CMTD**

मंत्रालय, मुंबई-४०००३२

दिनांक:- ०८ फेब्रुवारी, २०२४

**वाचा :-** सहकार, पणन वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र. धोरण २०२३/ प्र.क्र.११/ टेक्स-५, दि.०२ जून, २०२३.

**<u>प्रस्तावना</u> :-**

रेशीम उद्योग हा कृषि व वनसंपत्तीवर आधारित रोजगाराची प्रचंड क्षमता असलेला उद्योग आहे. राज्यातील हवामान हे रेशीम शेतीसाठी पोषक आहे. वातावरणाच्या लहरीपणामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी तसेच नियमित व हमखास उत्पन्न मिळविण्यासाठी रेशीम उद्योग हा राज्यातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे. शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्न मिळवून देण्याचे व ग्रामीण भागातील अर्थकारणाला चालना देण्याचे सामर्थ्य रेशीम शेती व त्यावर आधारीत पुरक उद्योगामध्ये आहे. राज्यातील शेतकऱ्यांना कृषि पिकाबरोबर हमखास व शाश्वत उत्पन्नाची हमी असलेल्या रेशीम शेती व त्यावर आधारीत पुरक व्यवसायास चालना देण्यासाठी एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत रेशीम उत्पादन वाढण्यासाठी आणि बाजारातील वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी शासनाने संदर्भाधीन दि.०२ जून, २०२३ अन्वये निर्णय घेतला आहे. सदर धोरणातील परिच्छेद ७.७ (ब) (२) मध्ये जालना व सोलापूरच्या धर्तीवर झोन १ व झोन ३ मध्ये खुल्या शासकीय कोष बाजारपेठेची स्थापना करण्यात येईल, परिच्छेद ७.७ (ब) (३) मध्ये जालना व बारामती येथे कच्चा रेशीम एक्सचेंज मार्केटची स्थापना करण्यात जाईल तसेच परिच्छेद ७.७ (ब) (५) मध्ये आरमोरी टसर कोष बाजार उभारण्यात येईल असे घोषित करण्यात आले आहे.

राज्यातील रेशीम शेतकऱ्यांनी उत्पादित केलेले कोष व कोषोत्तर प्रक्रियातंर्गत रिलींग उद्योजक यांनी उत्पादित केलेल्या सुतास खुली बाजारपेठ उपलब्ध व्हावी म्हणून सद्य:स्थितीत जालना व सोलापूर येथे खुल्या शासकीय बाजारपेठ उभारण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातूनही कोष खरेदी विक्री बाजारपेठ सुरू करण्यात आल्या आहेत. त्यामुळे राज्यातील रेशीम शेतकऱ्यांना वारंवार इतर राज्यात जावून कोष विक्री करण्याची गैरसोय दूर झाली आहे. तथापि, राज्यातील वाढते तुती लागवडीचे क्षेत्राबरोबर कोषाचे उत्पादन पाहता इतर ठिकाणी म्हणजेच झोन १ व झोन ३ मध्येही शासकीय कोष बाजारपेठा उभारणे आवश्यक आहे. या खुल्या बाजारपेठेमुळे शेतकऱ्यांना व रिलींग उद्योजकांना एकाच ठिकाणी कोष व सुत खरेदी विक्री करण्याची सुविधा निर्माण होणार असून त्याचा परिणाम रेशीम तुती लागवडीबरोबर कोषोत्तर

प्रक्रिया उद्योग वाढीस होणार आहे. तसेच पूर्व विदर्भातील चारही जिल्ह्यामध्ये टसर रेशीम उत्पादन घेतले जाते. टसर रेशीम शेतकऱ्याकडील पहिले व दुसरे पिक बीज कोष म्हणून घेतले जाते व तिसरे पिक व्यापारी पिक म्हणून घेतले जाते. या पिकातून उत्पादित होणाऱ्या कोषांना खुल्या बाजारात चांगला भाव मिळावा म्हणून आरमोरी जि.गडचिरोली येथे कोष बाजारपेठ स्थापन करणे आवश्यक आहे. त्यामुळे टसर रेशीम कोष उत्पादन वाढीसाठी मदत होईल.

रेशीम उद्योगामध्ये रोजगार निर्मितीला असणारा वाव विचारात घेता रेशीम उद्योगाला राज्याच्या अर्थव्यवस्थेत केंद्रस्थानी आणण्यासाठी व चालना मिळण्यासाठी तुती व टसर रेशीम कोष उत्पादकांकरिता शासकीय खुली कोषाची बाजारपेठ व कोषोत्तर प्रक्रियांतर्गत रिलींग उद्योजकांना सुत खरेदी विक्रीकरिता रेशीम सुत विनिमय बाजारपेठ स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील रेशीम शेती व त्यावर आधारित पूरक उद्योगाचा सर्वकष विकास व्हावा म्हणून तुती व टसर रेशीम शेतकरी यांनी उत्पादित केलेल्या रेशीम कोषास शासकीय खुली कोष खरेदी विक्री बाजारपेठ व कोषोत्तर प्रक्रिया उद्योगातील रिलींग उद्योजक यांना रेशीम विनिमय बाजारपेठाची खालीलप्रमाणे स्थापना करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**(१) शासकीय कोष बाजारपेठ (तुती)**

(अ) रेशीम कोषाची खुली बाजारपेठ, अमरावती.

(ब) रेशीम कोषाची खुली बाजारपेठ, येवला, जि.नाशिक.

**(२) शासकीय कोष बाजारपेठ (टसर)**

(अ) टसर रेशीम कोष बाजारपेठ, आरमोरी, जि.गडचिरोली.

**(३) रेशीम सुत विनिमय बाजारपेठ (सिल्क एक्सचेंज मार्केट)**

(अ) रेशीम सुत विनिमय बाजारपेठ, जालना.

(ब) रेशीम सुत विनिमय बाजारपेठ, बारामती, जि.पुणे.

२. सदर तुती व टसर कोष बाजारपेठा व सिल्क एक्सचेंज बाजारपेठा उभारणी करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध संस्थाच्या मार्गदर्शक सुचना, कार्यपध्दती तसेच वित्तीय नियम इत्यादी विचारात घेवून तांत्रिक व्यवहार्यता तपासून विस्तृत प्रकल्प अहवाल आर्थिक व भौतिक मापदंडासह संचालक (रेशीम) यांनी शासन मान्यतेस्तव सादर करावा.

३. सदर तुती व टसर कोष बाजारपेठा तसेच सिल्क एक्सचेंज बाजारपेठा स्थापन करण्यासाठी सध्या उक्त ठिकाणी अस्तित्वात असलेल्या सोयी सुविधांचा आढावा घेण्यात यावा तसेच इतर पारंपारिक राज्यातील बाजारपेठाच्या कार्यपध्दती, रचना इत्यादीचा अभ्यास करून आवश्यक त्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी सर्वसमावेशक विस्तृत प्रकल्प अहवाल शासनास सादर करण्याची कार्यवाही संचालक (रेशीम) यांनी करावी.

४. तुती व टसर कोष बाजारपेठा तसेच सिल्क एक्सचेंज बाजारपेठा स्थापन करण्याबाबतचा खर्च "मागणी क्र.व्ही-२, २८५१, ग्रामोद्योग व लघुउद्योग, १०७, रेशीम उद्योग, (०१) विविध सहकारी संस्थांना सहाय्य, (०१)(०२) राज्याचे वस्त्रोद्योग धोरण-२०१८-२३ रेशीम विकास कार्यक्रमांतर्गत पायाभूत सुविधा निर्माण करणे व अस्तित्वातील सुविधांचे बळकटीकरण (दत्तमत) (कार्यक्रम) (२८५१६५८३), ३३, अर्थसहाय्य" अंतर्गत आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात येईल.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०२०८१७०८३६९४०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRADDHA DEVEN KOCHAREKAR

Digitally signed by SHRADDHA DEVEN KOCHAREKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=COOPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT,
2.5.4.20=189da489d797e1e6a67b7d97496ef70683916299eab51c867c5a13147d142a80,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=CC51883E2B27843640CD6C07C96E3E8715CC5BFBE554420E4D68E5F4B112388A, cn=SHRADDHA DEVEN KOCHAREKAR
Date: 2024.02.08 17:17:41 +05'30'

**( श्रध्दा कोचरेकर )**

**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (गृह, विधी व न्याय विभाग) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.मंत्री (वस्त्रोद्योग) , सहकार, पणन व वस्त्रोद्योग यांचे खाजगी सचिव.
६) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद/ विधानसभा, विधान भवन, मुंबई.
८) सर्व माननीय संसद सदस्य/ विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
९) मा.समितीप्रमुख, महाराष्ट्र विधानमंडळ रोहयो समिती, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
१०) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
११) मा.सदस्य सचिव, केंद्रीय रेशीम मंडळ, बंगळूरू.
१२) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,सर्व मंत्रालयीन विभाग.
१३) सर्व विभागीय आयुक्त.
१४) आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजना, नागपूर.
१५) सर्व जिल्हाधिकारी.
१६) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१७) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), मुंबई.
१८) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), नागपूर.
१९) वरिष्ठ उप महालेखापाल (पडताळणी), बाह्य लेखापरिक्षा विभाग (नागरी), मुंबई.
२०) संचालक (रेशीम), रेशीम संचालनालय, नागपूर.
२१) उपसंचालक / सहायक संचालक, प्रादेशीक रेशीम कार्यालय, नागपूर/ अमरावती/ औरंगाबाद / पुणे.
२२) सर्व कोषागार अधिकारी.
२३) सर्व रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१ / श्रेणी-२.
२४) निवड नस्ती.